दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : ३३६ • पुणे • गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

# एमपीएससीच्या औषध निरीक्षक परीक्षा पेपर फुटीप्रकरणी सहा जण अटकेत


## एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांचाही समावेश

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) औषध निरीक्षक (गट-ब) पदासाठी झालेल्या चाळणी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी मुंबई गुन्हे शाखेने सहा जणांना अटक केली. अटक केलेल्यांमध्ये एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांचा समावेश आहे. ही परीक्षा २२ मार्च २०२६ रोजी घेण्यात आली होती.

महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक (गट-ब) पदासाठी २२ मार्च रोजी चाळणी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका तज्ज्ञांकडून अत्यंत गोपनीय पद्धतीने तयार करण्यात आल्या होत्या. मात्र, आरोपींनी परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिकेतील प्रश्न मिळवून त्यांचा स्वतंत्र संच तयार करून तो अनधिकृत व्यक्तींपर्यंत पोहोचला. त्यामुळे एमपीएससीच्या परीक्षेतील गोपनीयतेचा भंग झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाचे पोलीस निरीक्षक मंगेश देसाई यांच्या तक्रारीवरून २५ ऑगस्ट रोजी या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत २६ ऑगस्ट रोजी सहा जणांना अटक केली.अटक केलेल्यांमध्ये एमपीएससीचे सहायक विभाग अधिकारी विश्वेश्वर नकाते, अवर सचिव अभिजित लेंढवे आणि सहायक विभाग अधिकारी गोपाळ मराठे यांचा समावेश आहे. याशिवाय, नंदुरबार येथील कौटिल्य अकादमीचे संचालक प्रवीण पाटील, कथित सूत्रधार अमृत पाटील आणि लोकेश ऊर्फ गौरव पाटील यांना अटक करण्यात आली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस), महाराष्ट्र स्पर्धात्मक परीक्षांमधील गैरप्रकार प्रतिबंधक कायदा, २०२४, तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ मधील विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. फसवणूक, विश्वासघात, गुन्हेगारी कट आणि लोकसेवकांशी संबंधित भ्रष्टाचाराच्या आरोपांचा यात समावेश आहे.





अटक केलेल्या सहाही जणांना मुंबई सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त सदानंद राणे यांच्या नेतृत्वाखाली या प्रकरणाचा तपास सुरू आहे. प्रश्नपत्रिकेतील गोपनीय माहिती आरोपींपर्यंत नेमकी कशी पोहोचली, ती कोणाकोणाला वितरित करण्यात आली आणि या प्रकरणात आणखी किती जणांचा सहभाग आहे, याचा तपास गुन्हे शाखेकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या सहा जणांवरील आरोप अद्याप न्यायालयीन प्रक्रियेत सिद्ध झालेले नाहीत.

## आरोपी निघाला 'उत्कृष्ट शिक्षक' पुरस्कार विजेता

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पद भरती परीक्षा पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक आणि चक्रावून टाकणारे खुलासे होत आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी आणि नंदुरबार येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक अमृत पाटील यांना यापूर्वी राज्यस्तरीय 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले होते. आपल्या मुलीच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी एमपीएससीच्या तीन अधिकाऱ्यांशी तब्बल 12 लाख रुपयांत पेपर खरेदीचा सौदा केला होता, ज्यातील 5 लाख रुपये त्यांनी अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, 22 मार्च रोजी पार पडलेल्या या परीक्षेला बसलेल्या 40 हजार प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर या पेपरफुटीमुळे पाणी फेरलं आहे. ही पेपरफुटी एका वादग्रस्त 'लव्ह स्टोरी' आणि 'ब्रेकअप'मुळे समोर आली. या संपूर्ण पेपरफुटी प्रकरणामागे एक नाट्यमय लव्ह-हेट स्टोरी समोर आली आहे. अमृत पाटील यांनी कौटिल्य अकादमीच्या प्रवीण पाटील या दलालाच्या मदतीने 22 मार्चच्या परीक्षेच्या दोन दिवस आधी मुलगी ऋतुजा पाटील हिच्यासाठी प्रश्नपत्रिका मिळवली. ऋतुजाने प्रेमापोटी हा फुटलेला पेपर तिचा बॉयफ्रेंड आणि MPSC चाच अभ्यास करणारा विद्यार्थी गौरव पाटील उर्फ लोकेश याला दिला. मात्र निकाल जाहीर झाल्यावर ऋतुजा पाटील उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली, मात्र तिचा प्रियकर गौरव पाटील अपात्र ठरला. ऋतुजा आता अधिकारी होईल आणि आपल्यापासून दूर निघून जाईल या भीतीपोटी, तसेच लग्नाला नकार दिल्याच्या रागातून गौरवने थेट एमपीएससीकडे पेपरफुटीची तक्रार केली.




## थोडक्यात पण महत्वाचे



### स्वातंत्र्यदिनानिमित्त 'दत्तक वृक्ष योजना'; १५० वृक्षांचे वाटप

उरुळी देवाची (आरंभ पर्व) : स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून श्रुफिन वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने सौ. सविता विजय रासोटे यांच्या पुढाकारातून पुणे महानगरपालिकेच्या देवाची उरुळी येथील शाळेत 'दत्तक वृक्ष योजना' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सुमारे १५० वृक्षांचे वाटप करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड दत्तक देऊन त्याच्या संगोपनाची जबाबदारी विद्यार्थ्यांवर सोपविण्यात आली. वृक्षारोपणाबरोबरच त्यांचे नियमित संगोपन, पाणी देणे आणि संरक्षण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासोबतच निसर्गाप्रती जबाबदारीची भावना रुजविण्याचा हा अभिनव प्रयत्न ठरला. कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. नवनाथ श्रीपती तावरे, अभिजित वाणी सर, शिक्षकवृंद तसेच प्रमुख पाहुणे श्री. प्रशांत भाडळे, नगरसेवक, फुरसुंगी–उरुळी देवाची नगरपालिका, श्री. राजू भाडळे, माजी पंचायत समिती सदस्य, ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमासाठी रघुनाथ ढोले सर आणि देवराई फाउंडेशन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत झाडांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. "एक विद्यार्थी – एक झाड, हिरवाईकडे एक सुंदर पाऊल!" या संदेशातून पर्यावरणपूरक आणि हरित भविष्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.



### भौतिक सुविधा हस्तांतरणासह श्रुफिन वेल्फेअर फाउंडेशनचा सन्मान

खडकवासला (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिका शाळा क्रमांक १ व २, खडकवासला येथे भौतिक सुविधांच्या हस्तांतरणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी तसेच समाजातील गरजू घटकांसाठी विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या श्रुफिन वेल्फेअर फाउंडेशनच्या सामाजिक कार्याची दखल घेत फाउंडेशनचा सन्मान करण्यात आला. मा. नगरसेविका धनश्री कोल्हे मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक अमोल माने सर व शिक्षकवृंद यांच्या हस्ते फाउंडेशनचा गौरव करण्यात आला. फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी श्रुफिन वेल्फेअर फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. सविता विजय रासोटे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले एकल पालक योजना याबाबत मार्गदर्शन करून योजनेची माहिती दिली. तसेच एकल पालकांच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास मा. नगरसेविका धनश्री कोल्हे मॅडम, मुख्याध्यापक अमोल माने सर, दत्ता सैद सर, शिक्षकवर्ग, पालकवर्ग, विद्यार्थी तसेच श्रुफिन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय रासोटे उपस्थित होते. गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी श्रुफिन वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने सुरू असलेले कार्य निश्चितच प्रेरणादायी आणि कौतुकास्पद असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

### आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन



खडकवासला (आरंभ पर्व) : प्रजापिता ब्रह्माकुमारी आध्यात्मिक संस्था आणि मधली तालीम ट्रस्ट, खडकवासला यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या महत्वपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन प्रसंगी स्थानिक जनप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी नगरसेविका धनश्रीताई कोल्हे, नगरसेवक काकासाहेब चव्हाण, मधली तालीम ट्रस्ट मंडळाचे अध्यक्ष स्वप्निल भाऊ मते पदाधिकारी विजय भाऊ मते अनिल भाऊ मते, रमेशजी गायकवाड, अविनाश तिकवणे, प्रसाद मते, यज्ञिक साळुंके, रामदास मते, अजय मते, दिनेश मते, अक्षय मते उपस्थित होते. या वेळी त्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्रशंसा व्यक्त केली आणि रक्तदानाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. रक्तदान शिबिरात नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले, तर आरोग्य शिबिरात विविध आरोग्य तपासण्यांचे आयोजन करण्यात आले होते. प्रजापिता ब्रह्माकुमारी संस्थेच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला असून, त्यामागे जनजागृती, सामाजिक सेवा आणि आरोग्यविषयक जाणीव जागृत करण्याचा उद्देश होता. मधली तालीम ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी आवश्यक व्यवस्था केली होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी नागरिकांना नियमित आरोग्य तपासणी करण्याचे आणि रक्तदानाच्या माध्यमातून समाजसेवेत सहभागी होण्याचे आवाहन केले. या शिबिरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागृती निर्माण झाली.

### सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयातील स्वीकृत सदस्यपदासाठी चुरस

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयातील तीन स्वीकृत सदस्यपदांसाठी इच्छुकांमध्ये जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. आजअखेर ३४ नामांकन अर्ज घेण्यात आल्याचे जाहीर झाले असून, १ सप्टेंबरपर्यंत नामांकन अर्ज मिळणार आहेत. त्यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. त्यामुळे भागातील सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रातील इच्छुकांची लगबग वाढली आहे. युवकांना संधी मिळावी, या भावनेतून अनेक युवा कार्यकर्त्यांनी अर्ज घेतले असून, यावेळी नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार का, याकडे परिसराचे लक्ष लागले आहे. सामाजिक कार्यकर्त्यांसाठी ही संधी असली तरी राजकीय पाठबळ असलेल्या कार्यकर्त्यांनाही या प्रक्रियेत संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. सिंहगड रोड परिसरातील निखिल धावडे, तुषार श्रीहरी पोकळे, राजू कुटे, कोमल सतीश कुटे, शहाजी वांजळे, महेश पोकळे, रमेशबापू गायकवाड, सचिन मनेरे, वृषाली शेकदार, धनंजय पोकळे, गंगाधर भडावळे, अभिजित धावडे यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वीकृत सदस्यपदासाठी आपली तयारी सुरू केली आहे.

# अक्कलकोट भूषण व रत्न पुरस्कार सोहळा थाटात संपन्न

## आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण; पुण्यात अक्कलकोटच्या कर्तृत्ववानांचा गौरव



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अक्कलकोट तालुक्याशी नाळ जोडलेली असतानाच पुणे शहरात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून अक्कलकोटचे नाव उज्ज्वल करणाऱ्या कर्तृत्ववानांचा गौरव पुण्यात करण्यात आला. गावगाथा मीडिया नेटवर्कच्या वतीने आयोजित 'अक्कलकोट भूषण व रत्न पुरस्कार सोहळा २०२६' शनिवारी नितू मांडके सभागृह, स्वारगेट येथे उत्साहात पार पडला. अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या सोहळ्यात सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, कला, उद्योग, प्रशासन, पोलीस, न्यायव्यवस्था आणि अन्य क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या एकूण १५ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. अक्कलकोट भूषण पुरस्काराने जन्मेजयराजे भोसले महाराज, मल्लिनाथ कलशेट्टी, माधव राजगुरू आणि शरणकुमार लिंबाळे यांचा गौरव करण्यात आला. तर अक्कलकोट रत्न पुरस्काराने पौर्णिमाताई गायकवाड (आयपीएस), बंडोपंत कुलकर्णी (जिल्हा न्यायाधीश, पुणे), महेश बोळकोटगी (वरिष्ठ पोलीस निरीक्षक), रविकांत पाटील (सहकार व साखर उद्योग), विरभद्र हारकूड (संस्थापक अध्यक्ष, अक्कलकोट तालुका पुणे रहिवासी संघ), गणेश फुलारी (उद्योजक), संजीवकुमार हिळ्ळी (छायाचित्रणकार), चंद्रशेखर भांगे (पत्रकार, लोकशाही न्यूज), सिद्धार्थ कापसे (युवा उद्योजक), डॉ. अमोगसिद्ध चेंडके (मराठी भाषा व संतसाहित्य अभ्यासक) आणि ॲड. सदाशिव माळगे (शैक्षणिक व सामाजिक क्षेत्र) यांचा सन्मान करण्यात आला.

गावगाथा मीडिया नेटवर्कचे मुख्य संपादक धोंडप्पा नंदे म्हणाले, "नोकरी-व्यवसायानिमित्त पुण्यात वास्तव्यास असलो तरी आमची नाळ अक्कलकोटच्या मातीशी घट्ट जोडलेली आहे. पुण्यात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अक्कलकोटच्या भूमिपुत्रांचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे आणि मनोबल वाढावे, या उद्देशाने हा उपक्रम सुरू केला आहे. यापुढे दरवर्षी हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येईल."

सोहळ्यात प्रा. सदाशिव माळगे लिखित 'समतेचा शिल्पकार महात्मा बसवेश्वर' या पुस्तकाचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. महात्मा बसवेश्वर यांच्या समता, मानवता आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारांवर प्रकाश टाकणाऱ्या या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे कार्यक्रमाला वैचारिक अधिष्ठान लाभले. आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी गावगाथा मीडिया नेटवर्कच्या उपक्रमाचे कौतुक केले. पुण्यात नोकरी-व्यवसायासाठी स्थायिक झाल्यानंतरही अक्कलकोटच्या जनतेशी नाते कायम ठेवून तालुक्यातील कर्तृत्ववानांना एका व्यासपीठावर आणण्याचे काम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. "धोंडप्पा नंदे यांच्या माध्यमातून अक्कलकोट तालुक्यातील अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वे आणि उत्साही तालुकावासीयांना भेटता आले, हे माझे भाग्य आहे," असेही त्यांनी नमूद केले.

या पुरस्कार सोहळ्यामुळे पुण्यात वास्तव्यास असलेल्या अक्कलकोट तालुक्यातील विविध क्षेत्रांतील व्यक्तींना एकत्र येण्याची आणि एकमेकांच्या कार्याची ओळख होण्याची संधी मिळाली. अक्कलकोटपासून दूर राहूनही आपल्या कार्यातून तालुक्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या व्यक्तींच्या सन्मानाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी कल्याणराव मंठाळे, सोमेश्वर वाडी, डॉ. अमोगसिद्ध चेंडके, स्वामी चांगुले, संतोष राठोडे, प्रा. सदाशिव माळगे, अंबादास गवंडी आणि राहुल भंडारी यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमामागील संकल्पना, पुढाकार आणि अक्कलकोटकरांना एका व्यासपीठावर आणण्याची भूमिका गावगाथा मीडिया नेटवर्कचे मुख्य संपादक धोंडप्पा नंदे यांची होती. यापुढेही अक्कलकोटच्या कर्तृत्ववान भूमिपुत्रांचा गौरव करण्याची परंपरा सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## सलग तिसऱ्या तिमाहीत मोबिक्विक नफ्यात

**गुरुग्राम (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीच्या डिजिटल वॉलेट आणि फिनटेक कंपन्यांपैकी एक असलेल्या वन मोबिक्विक सिस्टिम्स लिमिटेड (मोबिक्विक)ने 30 जून 2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष 2027 च्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने सलग तिसऱ्या तिमाहीत नफा नोंदवत 7.6 कोटी रुपयांचा करपश्चात नफा (PAT) मिळवला आहे. आर्थिक वर्ष 2026 च्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत कंपनीच्या नफ्यात 49.5 कोटी रुपयांची सकारात्मक सुधारणा झाली आहे. नफाक्षमतेतील सातत्य, खर्चावरील नियंत्रण आणि पेमेंट्स तसेच वित्तीय सेवांमधील सुधारलेल्या मॉनेटायझेशनच्या जोरावर मोबिक्विकने आर्थिक वर्ष 2027 ची सुरुवात दमदार केली आहे. तिमाहीत कंपनीचा कॉन्ट्रिब्युशन प्रॉफिट 66 टक्क्यांनी वाढून 128.6 कोटी रुपये झाला. कंपनीचे कामकाजातून मिळणारे उत्पन्न 281.5 कोटी रुपये राहिले असून, त्यात वार्षिक 4 टक्के वाढ झाली. एकूण उत्पन्न 289.2 कोटी रुपये झाले, जे मागील वर्षाच्या तुलनेत 3 टक्क्यांनी अधिक आहे. याच काळात डायरेक्ट कॉस्टमध्ये 21 टक्के घट झाली.

## आरोग्यसेवा बळकटीकरणासाठी एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची बैठक

### आ. भीमराव तापकीर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना अधिक सक्षम, दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची महत्त्वपूर्ण बैठक सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयातील पुणे महानगरपालिका प्रभाग समिती सभागृहात पार पडली. आमदार भीमराव तापकीर यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत मतदारसंघातील आरोग्यविषयक विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



मतदारसंघाचा वाढता विस्तार आणि नागरिकांची वाढती संख्या लक्षात घेता आरोग्य सुविधांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करणे, उपलब्ध आरोग्य सेवांचा प्रभावी विस्तार करणे, नागरिकांना वेळेत उपचार व आरोग्य सुविधा मिळवून देणे तसेच आरोग्य विभागाशी संबंधित अडचणी सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर बैठकीत चर्चा झाली. नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला. प्राथमिक आरोग्य सुविधा, नागरिकांना मिळणाऱ्या सेवा, मनपाच्या आरोग्य विभागाशी संबंधित प्रश्न आणि भविष्यात आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. यावेळी नगरसेवक व सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समिती अध्यक्ष सचिन मोरे, नगरसेविका व महिला व बाल कल्याण समिती अध्यक्षा अल्पना वरपे, नगरसेविका व धनकवडी क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समिती अध्यक्षा प्रतिभा चोरघे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष गटनेते काकासाहेब चव्हाण,नगरसेवक हरिदास चरवड, नगरसेविका जयश्री भूमकर, रेश्मा बराटे, रुपाली पवार, धनश्री कोल्हे, हर्षदा भोसले, तेजश्री बदक, ज्योती गोसावी, कोमल नवले, नगरसेवक भारतभूषण बराटे, स्वीकृत नगरसेवक सुनिल शिंदे तसेच पुणे मनपाच्या सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा नाईक आणि आरोग्य विभागातील संबंधित अधिकारी उपस्थित होते. खडकवासला मतदारसंघातील नागरिकांना दर्जेदार, सुलभ आणि प्रभावी आरोग्य सेवा मिळाव्यात, यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींमध्ये समन्वय वाढवून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

## 'निरोगी सखी राहील सुखी' महापौर महिला आरोग्य अभियानाचा दुसरा टप्पा सुरू

### महिलांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेऊन निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करावा : महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या 'पुणे प्रथम' या संकल्पनेअंतर्गत 'निरोगी सखी राहील सुखी – महापौर महिला आरोग्य अभियान' राबविण्यात येत असून, या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याला आजपासून सुरुवात झाली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास पुण्याच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन तसेच महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित महिला भगिनींना आरोग्य विषयक मूलभूत सुविधा, तपासण्या व आवश्यक आरोग्य मार्गदर्शनाचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला.



यावेळी बोलताना महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे म्हणाल्या, "महिलांचे आरोग्य हे कुटुंबाच्या आणि समाजाच्या आरोग्याचा पाया आहे. अनेक महिला आपल्या कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महिलांना त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या जवळ आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने 'निरोगी सखी राहील सुखी' हे अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानाचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची नियमित तपासणी करून घ्यावी." या अभियानाच्या माध्यमातून महिलांना आरोग्य तपासणी, प्राथमिक निदान, आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन आणि आरोग्यविषयक जनजागृती उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. महिलांनी आजाराची लक्षणे जाणवण्याची वाट न पाहता नियमित आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचेही महापौरांनी सांगितले.

'निरोगी सखी राहील सुखी' हे अभियान केवळ आरोग्य तपासणीपुरते मर्यादित न राहता महिलांमध्ये प्रतिबंधात्मक आरोग्याची जाणीव निर्माण करणारे व्यापक अभियान म्हणून पुढे नेण्याचा पुणे महानगरपालिकेचा मानस आहे. पुणे शहरातील अधिकाधिक महिलांपर्यंत या अभियानाचा लाभ पोहोचविण्यासाठी आरोग्य विभागाने प्रभावी नियोजन करावे, असे निर्देशही महापौरांनी दिले.

कार्यक्रमास उपमहापौर श्री. परशुरामजी वाडेकर, अतिरिक्त आयुक्त सौ. पवनित कैर, नगरसचिव सौ. योगिता भोसले, नगरसेविका सौ. संगीताताई दांगट, ऐश्वर्या थोरात, अल्पना वर्पे, सौ. स्वरदा बापट, सौ. स्वप्नाली पंडीत, अर्चना पाटील, पूजा दांडेकर, रूपाली पवार, सौ. स्नेहाताई माळवदे, सौ. मनिषा बुटाला, सौ. कल्पना बहिरट, सौ. रुपाली पवार, सौ. शैलजा भोसले, सौ. जयश्रीताई भुमकर तसेच आरोग्य प्रमुख मीना बोराडे, डॉ. वैशाली जाधव, डॉ. मनिषा नाईक, डॉ. राजेश दिघे, डॉ. आंधळे, सारिका फुंदे यांच्यासह पुणे महानगरपालिकेचे आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## कै. प्रफुल्ल रायकर यांच्या स्मरणार्थ मोफत शालेय साहित्य किट वाटपाचे आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिववंदना मित्रपरिवार व न्यू आर्या फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने कै. प्रफुल्ल (दादा) सुधाकर गायकवाड यांच्या स्मरणार्थ गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय साहित्य किट वाटप उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. धायरी परिसरात घरकाम करणाऱ्या मावशी व ताई यांच्या मुलांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून, आर्थिक परिस्थितीमुळे शैक्षणिक साहित्याची अडचण भासणाऱ्या विद्यार्थ्यांना या माध्यमातून मदत केली जाणार आहे. उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आवश्यक शालेय साहित्य असलेले किट मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभ परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना मिळावा, यासाठी नागरिकांनी आपल्या परिचयातील गरजू कुटुंबातील विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याचे आवाहन




आयोजकांनी केले आहे. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा हा उपक्रम असून, कै. प्रफुल्ल (दादा) सुधाकर गायकवाड यांच्या स्मृती जपण्याचा एक सामाजिक प्रयत्न म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे. या उपक्रमासाठी श्री. प्राज भिलारे, संस्थापक, शिववंदना मित्रपरिवार, धायरी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९८३४२५९०१२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# खडकवासला मनपा शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध सुविधा

## ४४० विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी; व्हाईटबोर्ड, शैक्षणिक साहित्य वाटप आणि वृक्षारोपणाने कार्यक्रमाची रंगत

**खडकवासला, पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिका शाळा क्रमांक १ व २, खडकवासला येथे विद्यार्थ्यांसाठी विविध भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भौतिक सुविधा हस्तांतरण व सामाजिक कार्य गौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी, शैक्षणिक सुविधा तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध झाले.



भारती फाऊंडेशन, गांधीनगर, गुजरात शाखा पुणे यांच्या वतीने दोन्ही शाळांसाठी २५० लिटर क्षमतेचा सुमारे एक लाख रुपये किमतीचा आरओ वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आला. या उपक्रमामुळे शाळेतील सुमारे ४४० विद्यार्थ्यांच्या शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. फाउंडेशनच्या वतीने विश्वजित गिरीधारी व त्यांच्या टीमने या उपक्रमासाठी सहकार्य केले.

तसेच Inner Wheel Club of Pune यांच्या वतीने शाळेला पाच व्हाईटबोर्ड देण्यात आले. त्यामुळे अध्यापन प्रक्रिया अधिक प्रभावी होण्यास मदत होणार आहे.

यावेळी श्रुफिन वेल्फेअर फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला. मा. नगरसेविका सौ. धनश्री कोल्हे, भाजप नेते दत्ताभाऊ कोल्हे,मुख्याध्यापक श्री. अमोल माने व शिक्षकवृंद यांच्या हस्ते फाउंडेशनचा सन्मान करण्यात आला. फाउंडेशनच्या विविध सामाजिक उपक्रमांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक करून त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या.

श्रुफिन वेल्फेअर फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. सविता रासोटे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले एकल पालक योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी एकल पालकांच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. कार्यक्रमास मा. नगरसेविका सौ. धनश्री कोल्हे, क्रीडा अधिकारी श्री. सचिन वाडकर, पर्यवेक्षक सौ. नंदा डोळस, सह प्रशासकीय अधिकारी श्री. भूषण बहिरमे, सह प्रशासकीय अधिकारी श्री. सुरेश उचाळे, मुख्याध्यापक श्री. अमोल माने, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ. अर्चना बाणकर, श्री. दत्ता सैद, शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थी तसेच श्रुफिन कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय रासोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उपक्रमासाठी दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक श्री. अमोल माने व श्री. दत्ता सैद यांनी विशेष प्रयत्न केले. विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने शाळांना आवश्यक सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांनी व पालकांनी समाधान व्यक्त केले.

दरम्यान, कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळा परिसरात १५ वृक्षांचे रोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देतानाच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. "सेवेतून समाधान आणि शिक्षणातून सक्षम भविष्य" या भावनेतून सामाजिक संस्थांकडून सुरू असलेले कार्य विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी निश्चितच प्रेरणादायी आणि समाजोपयोगी ठरत आहे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
गुरुवार, दि. २७ ऑगस्ट २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### कसबा मतदारसंघात शिवसेनेतर्फे विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

पुणे (आरंभ पर्व) : हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कसबा मतदारसंघातील युवासेनेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आमदार कैलास पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची वाट अधिक सुकर व्हावी, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलावा, या उद्देशाने राबविण्यात आलेला हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे आमदार कैलास पाटील यांनी यावेळी सांगितले. समाजातील प्रत्येक घटकाच्या पाठीशी उभे राहून विद्यार्थीहितासाठी कार्य करणे हीच खरी समाजसेवा असल्याचे त्यांनी नमूद केले. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा जपत समाजसेवा, विद्यार्थीहित आणि तरुणांच्या सक्षमीकरणासाठी युवासेनेचे कार्य असेच अविरत सुरू राहावे, अशा सदिच्छाही आमदार कैलास पाटील यांनी व्यक्त केल्या. यावेळी पुणे शहरप्रमुख वसंत (तात्या) मोरे, नगरसेवक नितीन गावडे, युवासेना विभागप्रमुख सोहम जाधव, प्रभागप्रमुख सुमित जाधव, स्वप्नील वसवे, किरण जाधव यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सिंहगड रोडवरील वाहतूक कोंडीवर आढावा बैठक संपन्न

पुणे (आरंभ पर्व) : सिंहगड रोड परिसरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या प्रश्नावर माणिकबाग येथील अनुश्री हॉलमध्ये आढावा बैठक घेण्यात आली. सिंहगड रोडवरील विविध ठिकाणी वारंवार होणारी वाहतूक कोंडी, त्यामागील कारणे आणि वाहतूक सुरळीत करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. छत्रपती राजाराम पूल तसेच सिंहगड रोडवरील महत्त्वाच्या चेकपॉइंट्सवर वाहतूक पोलिसांची नियुक्ती करून वाहतुकीचे नियमन करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. वाहतूक कोंडीच्या ठिकाणी पोलिसांची प्रभावी उपस्थिती राहावी आणि नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास कमी व्हावा, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यावर भर देण्यात आला. या बैठकीस पोलीस निरीक्षक विवेक पाटणकर, वाहतूक पोलीस निरीक्षक राहुल गौड, देशमुख मॅडम, प्रभाग समिती अध्यक्ष नगरसेवक सचिन मोरे, हरिदास चरवड, नगरसेविका ज्योती गोसावी, कोमल नवलें, जयश्री भुमकर, पुणे महापालिका पथ विभागाच्या नेहा कोलते, महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुप चे संस्थापक शिवाभाऊ पासलकर यांच्यासह सिंहगड रोड परिसरातील स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. सिंहगड रोडवरील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत करण्यासाठी प्रशासन, वाहतूक पोलीस, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी समन्वयाने काम करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

### श्री क्षेत्र कानिफनाथ गडावर आज महाप्रसादाचे आयोजन



- अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांची ३३ वर्षाची महाप्रसादाची परंपरा

पुणे (आरंभ पर्व) : श्री क्षेत्र कानिफनाथ गड, बोपगाव (ता. पुरंदर, जि. पुणे) येथे श्रावण महिन्यातील तिसऱ्या गुरुवारी, २७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांच्या पुढाकारातून हा धार्मिक उपक्रम राबविण्यात येत असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसाद तसेच श्री क्षेत्र कानिफनाथ महाराजांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. गेल्या ३२ वर्षांपासून श्री क्षेत्र कानिफनाथ गडावरील महाप्रसादाची ही परंपरा सुरू आहे. कॉलेजच्या काळात मित्रमंडळींनी एकत्र येऊन सुरू केलेली ही सेवा आजही त्याच श्रद्धा आणि उत्साहाने पुढे नेली जात आहे. सुरुवातीला प्रत्येकाकडून थोडी-थोडी रक्कम जमा करून सुमारे २०० रुपये वर्गणीच्या माध्यमातून पहिल्या भंडारा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. श्रद्धा, मैत्री आणि सामाजिक बांधिलकीतून सुरू झालेला हा उपक्रम आज मोठ्या धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे स्वरूप धारण करून सातत्याने सुरू आहे. यंदाचा महाप्रसाद सोहळा या परंपरेतील सुमारे ३३वा वर्षाचा टप्पा ठरणार आहे. श्री क्षेत्र कानिफनाथ गड हे पुणे जिल्ह्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून, श्रावण महिन्यात येथे दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. महाप्रसादाच्या माध्यमातून भक्ती, श्रद्धा, मैत्री आणि सेवाभावाचा सुंदर संगम साधला जातो. अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप हे सामाजिक व सार्वजनिक जीवनात सक्रिय असून, विद्यमान नगरसेवक तसेच पुणे महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीचे माजी अध्यक्ष म्हणून त्यांनी विविध सामाजिक उपक्रमांत सहभाग घेतला आहे. धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिक व भाविकांशी असलेले नाते अधिक दृढ करण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे. महाप्रसाद सोहळ्याच्या निमित्ताने श्री क्षेत्र कानिफनाथ गड देवस्थानच्या वतीनेही भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री कानिफनाथ महाराजांचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# खड्ड्यामुळे मृत्यू झालेल्या मुलाच्या कुटुंबाला सहा लाख द्या

## स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांची आयुक्तांना सुचना : उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सूस-म्हाळुंगे रस्त्यावरील खड्ड्यामुळे झालेल्या अपघातात मृत्यू झालेल्या दहा वर्षांच्या मुलाच्या कुटुंबाला सहा लाख रुपये नुकसानभरपाई तातडीने द्यावी, अशी सुचना स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करून महापालिकेने स्वतःहून हे प्रकरण संबंधित समितीसमोर ठेवावे आणि नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू करावी, असे भिमाले



यांनी आयुक्तांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. सूस-म्हाळुंगे रस्त्यावरील खड्ड्यामुळे दुचाकी घसरून झालेल्या दुर्घटनेत दहा वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरातील खड्ड्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

या पार्श्वभूमीवर भिमाले यांनी आयुक्तांना पत्र देत मृत मुलाच्या कुटुंबाला न्यायालयाच्या आदेशानुसार नुकसानभरपाई देण्याची सुचना केली.

मुंबई उच्च न्यायालयाने १३ ऑक्टोबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार खड्डे किंवा उघड्या गटारांमुळे मृत्यू झाल्यास संबंधित व्यक्तीच्या कायदेशीर वारसांना सहा लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे निर्देश आहेत. अपघातात जखमी झालेल्यांनाही दुखापतीच्या स्वरूपानुसार नुकसानभरपाई देण्याची तरतूद असल्याचे भिमाले यांनी पत्रात नमूद केले आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रथम नुकसानभरपाई द्यायची आहे. त्यानंतर चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकारी, अभियंता अथवा कंत्राटदाराकडून ही रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करता येते. अशा प्रकरणांवर महापालिका आयुक्त आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिवांचा समावेश असलेली समिती निर्णय घेते

सूस-म्हाळुंगे दुर्घटनेतील मुलाचा मृत्यू खड्ड्यामुळे झाल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत असल्यास महापालिकेने तक्रारीची वाट न पाहता स्वतःहून हे प्रकरण समितीसमोर दाखल करावे आणि सहा लाख रुपये नुकसानभरपाई देण्याची कार्यवाही तातडीने सुरू करावी, असे भिमाले यांनी पत्रात म्हटले आहे.

> "सूस-म्हाळुंगे दुर्घटनेतील मृत मुलाच्या कुटुंबाला सहा लाख रुपये नुकसानभरपाई तातडीने द्यावी. सुरक्षित रस्ते देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. न्यायालयाचा स्पष्ट आदेश असताना पीडित कुटुंबाला मदतीसाठी प्रतीक्षा करायला लावू नये."
>
> **— श्रीनाथ भिमाले, अध्यक्ष, स्थायी समिती**

संबंधित रस्त्याची देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी कोणत्या विभागाकडे होती, याची चौकशी करावी. खड्डा दुरुस्त न करण्यास जबाबदार अधिकारी, अभियंता अथवा कंत्राटदाराची जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी. तसेच खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांतील नुकसानभरपाईसाठी सोपी आणि स्वतंत्र कार्यपद्धती तयार करण्याची सुचना ही भिमाले यांनी केली.

## सिंहगड रोड परिसरात प्रायोगिक तत्त्वावर वॉर्डन नेमावेत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रोड, वडगाव, हिंगणे खुर्द आणि आनंदनगर परिसरातील दिवसेंदिवस वाढत चाललेली वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर वॉर्डन नेमावेत, अशी मागणी प्रभाग क्रमांक ३५ मधील स्थानिक नगरसेवक श्रीकांत शशिकांत जगताप यांनी केली आहे. पुणे महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागांतर्गत वॉर्डनची नियुक्ती करण्यात यावी, यासाठी त्यांनी संबंधित विभागाला पत्र दिले आहे. वाहतूक कोंडीच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने श्रीकांत जगताप यांनी वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल गौड यांच्या समवेत सिंहगड रोड परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी हिंगणे खुर्द, विश्रांतीनगर चौक, लंडन पूल, वीर शैव बसवेश्वर महाराज चौक, छत्रपती संभाजी महाराज स्मारक चौक, वीर बाजी



पासलकर चौक, वीर शिवा काशीद चौक, गोयल गंगा, आनंदनगर, संतोष हॉलजवळील लेन, हिंगणे चौक, प्रकाश इनामदार चौक आणि राजाराम पूल चौक आदी ठिकाणी वाहतुकीच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी पुणे महानगरपालिकेचे सुरक्षा अधिकारी कचरे तसेच त्यांचे सहकारी आणि वाहतूक विभागातील पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांना मोडी लिपीचा परिचय



### शिवाजी राजगड स्मारक मंडळाचा प्रशिक्षण उपक्रम सुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तिच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा, तसेच इतिहासाच्या अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळ, पुणे यांच्या वतीने मोडी लिपी प्रशिक्षण उपक्रम सुरू करण्यात आला. या उपक्रमाचा उद्घाटन समारंभ शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग येथे उत्साहात पार पडला. श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळाच्या वतीने न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, न्यू इंग्लिश स्कूल, रमणबाग आणि माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालय या तीन शाळांमधील इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक शाळेतील ५० विद्यार्थ्यांचा या उपक्रमात सहभाग असून, पुढील दोन महिने आठवड्यातून दोन दिवस विद्यार्थ्यांना मोडी लिपीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासोबतच विविध मान्यवरांची व्याख्याने तसेच विद्यार्थ्यांसाठी वारसा सहलीचे आयोजन करण्यात येणार आहे. उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्यू इंग्लिश स्कूल, रमणबागच्या शाळाप्रमुख श्रीमती आशा माने होत्या. यावेळी न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोडच्या शाळाप्रमुख राव मॅडम तसेच माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयाच्या शाळाप्रमुख बनकर मॅडम उपस्थित होत्या. मंडळाचे अध्यक्ष श्री. मंगेश राव यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार केला. पुणे महानगरपालिकेचे उपयुक्त मा. श्री. माधव जगताप हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मोडी लिपी तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाच्या संदर्भातून मार्गदर्शन केले. मोडी लिपी तज्ज्ञ श्री. राजेंद्र ढुमे यांनी मोडी लिपीचा इतिहास, तिचे महत्त्व आणि ऐतिहासिक दस्तऐवजांच्या अभ्यासातील तिची भूमिका विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री शिवाजी राजगड स्मारक मंडळाचे श्री. योगेंद्र भालेराव यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्री. अजिंक्य साठे यांनी केले.

> **इतिहास समजून घेण्यासाठी मोडी लिपी महत्त्वाची**
>
> मराठी भाषेच्या इतिहासात मोडी लिपीला महत्त्वाचे स्थान आहे. मराठ्यांचा मोठा इतिहास मोडी लिपीत लिहिलेल्या पत्रसंग्रह आणि ऐतिहासिक दस्तऐवजांच्या माध्यमातून उलगडला गेला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लहान वयातच मोडी लिपीचा परिचय व्हावा, त्यांच्यामध्ये इतिहासाविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी आणि आपल्या इतिहासाचा सखोल अभ्यास करण्याची प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे श्री. अजिंक्य साठे यांनी सांगितले.

## अखिल शिक्षक संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जुन्नर (दै. आरंभ पर्व)**

जनगणनेच्या कामाचे प्रलंबित मानधन, अर्जित रजा तसेच शिक्षकांवर सोपविण्यात येणाऱ्या अशैक्षणिक कामांबाबत अखिल पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने सोमवारी ता.२४ रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले.

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांची भेट घेण्यात आली यावेळी अखिल पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सुभाष मोहरे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा केली. जनगणना कामातील



प्रगणक, पर्यवेक्षक व जिल्हा फिल्ड ट्रेनर यांचे मानधन केंद्र शासनाच्या १३ऑगस्ट२६ रोजीच्या पत्रानुसार तातडीने अदा करण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. भविष्यात निवडणूक वगळता कोणतेही राष्ट्रीय कर्तव्याचे काम सोपविताना जिल्ह्यातील सर्व विभागांच्या आस्थापना, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समान सहभाग घ्यावा. केवळ शिक्षकांवरच अतिरिक्त कामाचा भार अथवा जबाबदारी देऊ नये, अशी मागणी करण्यात आली. तसेच १६ मे ते १४ जून २०२६ जनगणना कालावधीतील कामासाठी २०११ च्या धर्तीवर तसेच शासन निर्णय दि. २९ ऑक्टोबर २०१० अन्वये अर्जित रजा मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबतचे निवेदन केंद्र व राज्य शासनाकडे सादर करून पुढील कार्यवाही करण्याची विनंती संघटनेने केली. शिक्षकांना जनगणना, एस.आय.आर. यांसारखी विविध अशैक्षणिक कामे सोपविल्यानंतर आता ग्रामपंचायत सचिव पदाची अतिरिक्त जबाबदारी देण्यात येत असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी आहे. त्यामुळे शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करून त्यांना केवळ अध्यापनाच्या कामावर लक्ष केंद्रित करण्याची संधी द्यावी, अशी मागणीही शिष्टमंडळाने केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी शिक्षक संघटनेने मांडलेले प्रश्न हे शिक्षकांच्या जिव्हाळ्याचे व हिताचे असून, निवेदनातील मागण्यांबाबत आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी अखिल पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सुभाष मोहरे, जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम हगवणे तसेच अखिल जुन्नर तालुका संघटक तानाजी सांगडे उपस्थित होते.

## गुरु-परंपरा, ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानावर बापूंचे चिंतन

**बोस्टन (दै. आरंभ पर्व)**

अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठाच्या सँडर्स थिएटर मेमोरियल हॉलमध्ये आयोजित 'मानस गुरुप्रसाद' रामकथेचा आठवा दिवस भक्ती, गुरु-परंपरा, ज्ञान, साधेपणा आणि आधुनिक तंत्रज्ञानावरील चिंतनाने संपन्न झाला. यावेळी यावर्षीचा तुळशी जन्मोत्सवही भक्तिभावाने साजरा करण्यात आला. कथेच्या आठव्या दिवशी सकाळच्या सत्रातील शेवटच्या भाषणात चित्रकूट कामदगिरी परिक्रमा परिसरातील महंत श्री पूज्य राम हृदयदास जी महाराज यांनी बापूंच्या कार्याचे कौतुक केले. "बापूंसारखा पुत्र लाभल्याने



भारतमातेला अभिमान वाटेल," असे गौरवोद्गार त्यांनी काढले. बापूंच्या दरबारातील प्रेम, माया आणि स्नेहाचा उल्लेख करताना त्यांनी प्रत्येकासाठी या दरबाराचे दरवाजे खुले असल्याचे सांगितले. "चित्रकूट हे असे ठिकाण आहे, जिथे चोहीकडे दरवाजे आहेत. बापूंच्या दरबारात कोणालाही प्रवेश मिळतो. बापू प्रेम, माया आणि स्नेह देतात," असे ते म्हणाले. बापूंच्या उपस्थितीमुळे हार्वर्डमधील सभागृहही राजमहाल आणि रामाच्या निवासस्थानासारखे भासत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. "जिथे बापू बसतात, तेच एकत्र येण्याचे ठिकाण आहे," असेही त्यांनी नमूद केले.

# कुमार प्रल्हाद धोंगडे यांच्या पुढाकाराने प्रभागातील नागरी समस्यांवर तातडीने उपाययोजनांची मागणी

## आम आदमी पार्टीचा महानगरपालिकेकडे पाठपुरावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आम आदमी पार्टी, पुणे शहरचे उपाध्यक्ष कुमार प्रल्हाद धोंगडे यांच्या पुढाकाराने त्यांच्या प्रभागातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध नागरी समस्यांच्या तातडीने सोडवणुकीसाठी आज पुणे महानगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना निवेदने देण्यात आले. अप्पर सुप्पर इंदिरानगर, अंबामाता मंदिर चौक, सुखसागर नगर परिसरातील अनधिकृत भाजी स्टॉल, अतिक्रमणे, रस्त्यावरील अनधिकृत पार्किंग, अरुंद झालेले रस्ते व फुटपाथ यामुळे नागरिक, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः अंबामाता चौकातील भाजी मार्केट परिसरातील अनधिकृत व्यवसायामुळे वाहतूक कोंडी आणि पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा



प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच अंबामाता मंदिर ते खंडोबा मंदिर परिसरातील फुटपाथची दुरवस्था दूर करून आवश्यक ठिकाणी नवीन फुटपाथ बांधावा, अस्तित्वातील फुटपाथ दुरुस्त करून नागरिकांसाठी खुला करावा, फुटपाथवरील अतिक्रमणे व अनधिकृत पार्किंग हटवावे आणि दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. या परिसरातील वाहतूक कोंडी, पार्किंगची समस्या, अतिक्रमणे, फुटपाथ, रस्ते, विद्युत पोल तसेच DP रोड यासंबंधीच्या प्रश्नांवर संबंधित विभागांनी संयुक्त पाहणी करून ठोस व कालबद्ध उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

कुमार प्रल्हाद धोंगडे यांच्या पुढाकाराने संबंधित अधिकाऱ्यांकडे केवळ तक्रार न करता प्रत्यक्ष पाहणी करणे, जबाबदार विभाग निश्चित करणे आणि प्रत्येक समस्येवर निश्चित कालमर्यादेत कार्यवाही करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला आहे. महानगरपालिका नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर कर वसूल करते. त्यामुळे नागरिकांना सुरक्षित रस्ते, स्वच्छ व मोकळे फुटपाथ, सुरळीत वाहतूक आणि आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अंगणवाडी सेविकांचे काम उल्लेखनीय
### जि. प. अध्यक्ष वीरधवल बाबा जगदाळे

दौंड (आरंभ पर्व) : दौंड तालुक्यातील ग्रामपंचायत लिंगाळी येथे माझं गाव आरोग्य संपन्न गाव या संकल्पनेतून तेज फाउंडेशन पुणे व रात्री संस्था आणि प्राथमिक आरोग्य केंद्र कुरकुंभ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिर घेण्यात घेण्यात आले होते, यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे विद्यमान अध्यक्ष तथा दौंड शुगरचे संचालक वीरधवल बाबा जगदाळे याप्रसंगी बोलत होते ते म्हणाले की कोरोनाच्या काळामध्ये सर्वात जास्त काम आणि सेवा जर कोणी केली असेल ते म्हणजे अंगणवाडी अंगणवाडी सेविका यांनी केली आहे, या कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली, या शिबिरामध्ये ईसीजी 58 जणांची तपासणी करण्यात आली, एक्स-रे 118 जागांचा काढण्यात आला, एचबी 115 जणांचा तपासण्यात आला, शुगर 115 जणांची तपासण्यात आली, कॅन्सर तपासणी 31 जणांची करण्यात आली तर 53 जाण्याची बीपी तपासण्यात आली, यावेळी अनेक मान्यवर डॉक्टर उपस्थित होते, या कार्यक्रमाला पुणे जिल्हा परिषदेचे सदस्य साहेबराव पोळ, विद्यमान सरपंच सुनील जगदाळे, माजी सरपंच सुहास जगदाळे, सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब लोंढे, माजी चेअरमन जालिंदर जगदाळे, ग्रामपंचायत अधिकारी मच्छिंद्र निगडे, माजी सदस्य संजीव गावडे, सुजित जगदाळे, तसेच आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य सोसायटीचे आजी-माजी सदस्य अंगणवाडी सेविका तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पुणे पोलिसांची कर्णकर्क आवाजाविरोधात धडक कारवाई

पुणे (आरंभ पर्व) : शहरात कर्णकर्कश आवाजाविरोधात पुणे पोलिसांनी अत्यंत ठाम भूमिका घेतली आहे. मोहम्मद पैगंबर जयंतीनिमित्त मिरवणूक काढणाऱ्या विविध मंडळांची भेट घेऊन पोलीस निरीक्षकांनी त्यांना आवाजाच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आणि अनधिकृत डीजे सिस्टीम लावण्यापासून परावृत्त केले. या मोहिमेअंतर्गत फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक (वपोनी) संदिप देशमाने यांनी कसबा पेठेतील कागदीपुरा येथे एका मंडळाने लावलेले अतिरिक्त स्पीकर्स स्वतः उपस्थित राहून कमी करायला लावले आणि ही कारवाई अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी घेतलेल्या '१ बेस १ TOP' च्या नियमाची आणि निर्णयाची प्रत्यक्ष जमिनीवर कडक अंमलबजावणी होताना दिसत आहे. पोलिसांच्या या तत्परतेमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



### करिअरच्या सुरुवातीची मेहनत यशाकडे नेणारी : आनंद देशमुख

पुणे (आरंभ पर्व) : "करिअरमध्ये सुरुवातीची १५ वर्षे मेहनत घेतली, नवीनवीन गोष्टी शिकलात आणि केवळ पैशांच्या मागे न लागता काम केले, तर भविष्यात हव्या असलेल्या गोष्टी तुमच्याकडे चालत येतात. त्यामुळे कठोर मेहनत, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि नवकौशल्य आत्मसात करीत करिअर घडवावे," असे प्रतिपादन फ्युरेशिया इंडियाचे संचालक (फायनान्स अँड कंट्रोलिंग) सीएम आनंद देशमुख यांनी केले. दी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाऊंटंटस ऑफ इंडियाच्या (आयसीएमएआय) पुणे शाखेतर्फे सीएमए मुख्य (फायनल) आणि पूर्व (इंटरमीजिएट) परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. कर्वेनगर येथील सीएमए भवनात झालेल्या कार्यक्रमावेळी आयसीएमएआय पुणे शाखेचे अध्यक्ष सीएमए राहुल चिंचोळकर, आयसीएमएआयचे माजी अध्यक्ष अमित आपटे, विद्यार्थी समन्वय समितीचे अध्यक्ष सीएमए अमेय टिकले, पुणे शाखेचे उपाध्यक्ष सीएमए हिमांशू दवे, सीएमए निखिल अग्रवाल, माजी अध्यक्ष सीएमए श्रीकांत ईप्पलपल्ली, सीएमए निलेश केकाण, सीएमए नागेश भागणे आदी उपस्थित होते. दुपारच्या सत्रात इंटरमिजिएट परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या सत्कारावेळी जेएसडब्ल्यू जेएफई नाशिक कंपनीचे मुख्य वित्त अधिकारी सीएमए अमित एरोन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

### बांधकाम हे मानवी संस्कृतीइतकेच प्राचीन आणि समृद्ध क्षेत्र : बडवे



पुणे (आरंभ पर्व) : "शेतीनंतर मानवी जीवनातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा व्यवसाय असलेले बांधकाम क्षेत्र प्राचीन आणि समृद्ध आहे. प्रदीर्घ काळापासून मानवाने स्वतःसाठी निवारा निर्माण करण्यापासून या क्षेत्राची सुरुवात झाली आहे. आधुनिक काळात या क्षेत्रात सिमेंट, कंक्रीट, लिफ्ट्स, एस्कलेटर यांसारखे नवनवीन शोध व तंत्रज्ञान आले असून या क्षेत्राचे महत्त्व अतोनात वाढले आहे. बदलत्या काळानुसार बांधकाम क्षेत्रात सुरक्षित, गुणवत्तापूर्ण व पर्यावरणपूरक बांधकाम पद्धती विकसित व्हावी," असे मत प्रख्यात वास्तुरचनाकार आर्कि. व्ही. व्ही. बडवे यांनी व्यक्त केले. पुणे कन्स्ट्रक्शन इंजिनिअरिंग रिसर्च फाऊंडेशनच्या (पीसीईआरएफ) ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बडवे बोलत होते. शिवाजीनगर येथील हॉटेल तरवडे क्लार्क्स इन येथे आयोजित कार्यक्रमावेळी 'पीसीईआरएफ'चे अध्यक्ष इंजि. नरेंद्र कोठारी, सचिव आर्कि. शिरीष केंभावी, ज्येष्ठ सदस्य अशोक बेहरे, वामनराव कुलकर्णी, जयंत इनामदार आदी उपस्थित होते. यावेळी 'पीसीईआरएफ'तर्फे जे. पी. श्रॉफ, विश्वास लोकरे, संजय वायचळ, श्रीकांत निवसरकर आदींचा सन्मान करण्यात आला. बांधकाम क्षेत्रातील अग्रगण्य असणाऱ्या 'कॉन्स्ट्रो २०२७' आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाची घोषणा करण्यात आली. तसेच हैदराबाद येथील 'हिटेक्स एक्झिबिशन सेंटर' येथे होणाऱ्या 'कॉन्स्ट्रो' प्रदर्शनासाठी हायबीज संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात आला.

# उमेश गित्ते यांच्यासारखे अधिकारी समाजाचा विश्वास जिंकतात

## नागरिक–पोलीस संवादातून निर्माण होणारा विश्वास हीच सुरक्षित समाजाची खरी ताकद

**मा. प्रतिक गंगणे - शाईचा प्रवास**

**मोबाईल : 7276314142**

**पोलीस आणि नागरिक यांच्यातील नाते हे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेपुरते मर्यादित नसते. हे नाते विश्वासाचे, सहकार्याचे आणि माणुसकीचे असते. काही पोलिसांच्या चुकीच्या वर्तनामुळे संपूर्ण पोलीस दलाकडे संशयाने पाहिले जाते; मात्र काही निवडक अधिकारी आपल्या कर्तव्यनिष्ठा, संवेदनशीलता आणि सकारात्मक दृष्टिकोनातून या प्रतिमेला नवी दिशा देत असतात. येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. उमेश गित्ते हे त्यापैकीच एक नाव म्हणावे लागेल.**

कल्याणी नगर परिसरातील नागरिकांच्या विविध प्रश्नांवर पोलिसांनी घेतलेली दखल, ध्वनी प्रदूषणावर केलेली कारवाई, परिसरातील सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी केलेले प्रयत्न आणि नागरिकांच्या तक्रारींकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन यामुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. या कामामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते यांची भूमिका विशेष उल्लेखनीय ठरते. आजच्या काळात नागरिक आणि पोलीस यांच्यातील संवाद वाढणे अत्यंत गरजेचे आहे. एखादी घटना घडल्यानंतरच पोलिसांची आठवण होण्यापेक्षा, परिसरातील समस्या, नागरिकांच्या अडचणी, वाहतूक, ध्वनी प्रदूषण, महिला सुरक्षा, सार्वजनिक शांतता अशा विषयांवर नियमित संवाद झाला तर अनेक प्रश्न निर्माण होण्यापूर्वीच त्यांचे निराकरण करता येऊ शकते.

कल्याणी नगरमधील नागरिकांनी येरवडा पोलीस ठाण्यात आयोजित केलेला स्नेहसंमेलनाचा उपक्रम याच सकारात्मक संवादाचे उदाहरण आहे. पोलिस अधिकाऱ्यांचा सत्कार, आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणरायाची प्रतिमा भेट देणे आणि रक्षाबंधनाच्या निमित्ताने महिला रहिवाशांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राखी बांधणे, हा केवळ सत्काराचा कार्यक्रम नव्हता; तर 'पोलीस आमच्यासाठी आहेत आणि आम्हीही पोलिसांसोबत आहोत', हा विश्वास व्यक्त करणारा क्षण होता. विशेष म्हणजे, पोलिसांकडे केवळ अधिकाराच्या नजरेने न पाहता त्यांच्यामधील माणूस ओळखण्याची गरज आहे. पोलीसही आपल्या कुटुंबापासून दूर राहून, अनेकदा सण-उत्सव बाजूला ठेवून समाजाच्या सुरक्षिततेसाठी कर्तव्य बजावत असतात. त्यांच्यातही भावना आहेत, कुटुंब आहे, अपेक्षा आहेत आणि समाजाकडून मिळणाऱ्या सन्मानाची त्यांनाही गरज असते.

याचा अर्थ पोलिसांच्या चुकीच्या कृतींकडे दुर्लक्ष करावे असा अजिबात नाही. चुकीचे वर्तन झाले तर त्यावर प्रश्न उपस्थित झालेच पाहिजेत. मात्र काही व्यक्तींच्या चुकीमुळे संपूर्ण पोलीस दलाला दोषी ठरवणेही तितकेच अन्यायकारक आहे. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे कौतुक झाले, तर त्यातून इतरांनाही प्रेरणा मिळते. याच संदर्भात उमेश गित्ते यांचे कार्य विशेष कौतुकास्पद आहे. नागरिकांच्या तक्रारींकडे गांभीर्याने पाहणे, परिसरातील समस्या समजून घेणे आणि उपलब्ध यंत्रणेच्या



माध्यमातून त्यावर कार्यवाही करण्याचा प्रयत्न करणे, ही त्यांच्या कार्यपद्धतीची सकारात्मक बाजू नागरिकांच्या अनुभवातून समोर येते.

ध्वनी प्रदूषणासारखा विषय अनेकदा दुर्लक्षित केला जातो. मात्र त्याचा नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर मोठा परिणाम होतो. उशिरापर्यंत सुरू राहणारा गोंगाट, व्यावसायिक आस्थापनांमधील अनावश्यक आवाज आणि सार्वजनिक शांततेचा प्रश्न यावर सातत्याने लक्ष देणे आवश्यक असते. या बाबतीत नागरिकांच्या तक्रारींची दखल घेतली गेल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे. प्रत्येक पोलीस चौकीत उमेश गित्ते यांच्यासारखा एक अधिकारी असावा, ही भावना केवळ एखाद्या अधिकाऱ्याचे कौतुक नाही; तर नागरिकांना कोणत्या प्रकारचा पोलीस अधिकारी अपेक्षित आहे, याचे प्रतीक आहे. कायद्याची अंमलबजावणी करताना कठोरता आणि नागरिकांशी वागताना संवेदनशीलता या दोन्ही गोष्टींचा समतोल साधणारे अधिकारी समाजाचा विश्वास जिंकतात.

नागरिकांनीही पोलिसांना केवळ तक्रार किंवा कारवाईची यंत्रणा म्हणून न पाहता, समाजाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे. त्याचवेळी पोलिसांनीही नागरिकांशी संवाद, पारदर्शकता आणि संवेदनशीलता कायम ठेवली पाहिजे. दोन्ही बाजूंनी एक पाऊल

> शेवटी एवढेच पोलीस म्हणजे केवळ गणवेश नाही, तर त्या गणवेशामागे एक माणूस असतो. त्याच्या चांगल्या कामाचे कौतुक करणे, त्याला प्रोत्साहन देणे आणि समाजासाठी सकारात्मक काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुढे आणणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. आणि म्हणूनच, उमेश गित्ते यांच्यासारख्या कर्तव्यनिष्ठ, संवादप्रिय आणि सकारात्मक दृष्टिकोन असलेल्या अधिकाऱ्यांचे कौतुक केवळ एका कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, ते समाजाच्या विश्वासाचा भाग बनले पाहिजे. कारण चांगल्या पोलिसांचे कौतुक झाले, तर चांगल्या पोलिसिंगची संस्कृती अधिक बळकट होते.

पुढे पडले, तर सुरक्षित आणि विश्वासार्ह समाजाची निर्मिती नक्कीच शक्य आहे.

कल्याणी नगरमधील हा स्नेहसंमेलनाचा प्रसंग म्हणूनच महत्त्वाचा आहे. एका बाजूला पोलिसांच्या चांगल्या कामाचे कौतुक झाले, तर दुसऱ्या बाजूला पोलिसांनीही नागरिकांशी असलेला संवाद आणि सहकार्य अधिक मजबूत करण्याचा संदेश दिला.

## निसस फायनान्सकडून रिअल इस्टेटचे टोकनायझेशन

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

निसस हाय यिल्ड ग्रोथ फंडच्या माध्यमातून समर्थित NIFCOT1 या पहिल्या टोकनाइज्ड ऑफरचे लाँच करून निसस फायनान्स सर्व्हिसेस कंपनी लिमिटेडने संस्थात्मक रिअल इस्टेट गुंतवणुकीला ब्लॉकचेन पायाभूत सुविधांशी जोडण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. डिजिटल ॲसेट मार्केटप्लेस Toyow सोबतच्या भागीदारीतून ही ऑफर सादर करण्यात आली असून, नियमनाधीन रिअल-वर्ल्ड ॲसेट्स (RWA) गुंतवणुकीसाठी 500 दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या बहु-टप्प्यांच्या रोडमॅपची सुरुवात करण्यात आली आहे. निसस फायनान्सच्या दुबईस्थित DIFC-नियमनाधीन निसस हाय यिल्ड ग्रोथ फंडद्वारे NIFCOT1 ला पाठबळ मिळाले आहे. हा फंड GCC आणि EMEA प्रदेशांतील पूर्ण झालेले, पूर्व-भाडेकरार असलेले तसेच नियमित उत्पन्न देणाऱ्या निवासी आणि व्यावसायिक रिअल इस्टेट

- **Toyow सोबत भागीदारी; 500 दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या RWA गुंतवणूक रोडमॅपची सुरुवात**

प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करतो. स्पेशल पर्पज व्हेईकल (SPV) मार्फत संरचित करण्यात आलेले NIFCOT1 हे फंडाशी संबंधित टोकनाइज्ड आर्थिक हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करते. पहिल्या ऑफरमध्ये 1 लाख डिजिटल मालकी टोकन्स असून, त्यांचे प्रारंभिक इश्यू मूल्य 50 दशलक्ष अमेरिकी डॉलर आहे. ही ऑफर प्रस्तावित 500 दशलक्ष अमेरिकी डॉलरच्या व्यापक रोडमॅपचा पहिला टप्पा आहे. ही ऑफर Xchain Technologies FZCO संचलित डिजिटल ॲसेट मार्केटप्लेस Toyow च्या सहकार्याने बाजारात आणली जात आहे. संपूर्ण रोडमॅपसाठी दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला असून, Toyow Marketplace वर सूचीबद्ध होणारी NIFCOT1 ही पहिली ॲसेट आहे.

## सैनिकांच्या मनगटावर बांधली जाणार विद्यार्थ्यांच्या प्रेमाची राखी





**पुणे -लक्ष्मण साबळे (दै. आरंभ पर्व)**

देशाच्या सीमेवर ऊन, वारा, पाऊस आणि प्रतिकूल परिस्थितीची पर्वा न करता मातृभूमीच्या रक्षणासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या सैनिक बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कै. नारायणराव नवले प्राथमिक शाळा, मनपा शाळा क्रमांक ५६-ब, वडगाव खुर्द येथे 'पहिली राखी सैनिकांसाठी' हा भावनिक उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने सुंदर राख्या तयार केल्या. या राख्यांवर सैनिक बांधवांना समर्पित विविध भावनिक संदेश लिहून विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आपल्या हाताने तयार केलेली राखी देशरक्षणासाठी सीमेवर उभ्या असलेल्या सैनिकाच्या मनगटावर बांधली जाणार, या भावनेने विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या राख्या शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. सुमन गंथडे आणि इयत्ता सातवीची विद्यार्थिनी एंजल गायकवाड यांच्या हस्ते आधार सोशल ट्रस्टच्या कार्यकर्त्या सौ. विजया माने यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या.

नवले शाळेत गेल्या अनेक वर्षांपासून 'पहिली राखी सैनिकांसाठी' हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक या उपक्रमात मनापासून सहभागी होतात. राखीच्या धाग्यातून सैनिकांप्रती असलेला आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा प्रयत्न विद्यार्थ्यांच्या मनावर देशप्रेमाचे संस्कार रुजविणारा ठरत आहे. 'आम्ही तुमच्या पाठीशी आहोत... तुम्ही देशाचे रक्षण करता, म्हणून आम्ही निर्धास्त आहोत!' हा भाव या चिमुकल्यांच्या प्रत्येक राखीतून व्यक्त होत आहे. सैनिकांच्या मनगटावर बांधली जाणारी ही राखी केवळ धागा नसून, देशाच्या रक्षणासाठी झटणाऱ्या प्रत्येक वीर जवानासाठी एका चिमुकल्या मनाने पाठवलेली प्रेमाची, कृतज्ञतेची आणि सुरक्षिततेची हाक आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाचा खरा अर्थ समजत असून, सैनिकांप्रती आदर आणि देशप्रेमाची भावना त्यांच्या मनात कायमची रुजत आहे.

## वरुण राजा, पुणे-मुंबईत खूप बरसलास...
# आता जरा आमच्या गावाकडेही ये रे!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तिकडची धरणं भरली आहेत, नद्या वाहू लागल्या आहेत; पण इकडे शेतकऱ्याच्या शिवारात उभं असलेलं सोयाबीन पाण्यावाचून सुकत चाललं आहे. मोठ्या आशेने पेरलेलं पीक डोळ्यांसमोर करपताना पाहण्याची वेळ बळीराजावर आली आहे.

कर्ज काढून, मातीमध्ये पैसा टाकून, काळ्या आईच्या कुशीत सोयाबीनचं बी टाकलं. पीक चांगलं उगवलं, जोमाने वाढलं. पीक पाहून शेतकऱ्याच्या डोळ्यांत स्वप्नं तरळली. यंदा तरी कर्जाचा भार थोडा हलका होईल, घरखर्च भागेल, मुलांच्या शिक्षणासाठी पैसे मिळतील, अशी आशा निर्माण झाली. पण आता ऐन पिकाच्या काळात पावसाने दडी मारली आहे. रोज सकाळी शेतकरी आभाळाकडे पाहतो. एखादा काळा ढग दिसला की मनात आशा निर्माण होते. वाटतं, आज वरुण राजा बरसेल... पण ढग येतात आणि निघून जातात. पावसाच्या दोन-चार सरींची आस लावून बसलेल्या शेतकऱ्याच्या पदरी मात्र निराशाच येते. वरुण राजा, आता तरी बरस रे!



कारण हे फक्त सोयाबीनचं पीक नाही, तर एका शेतकऱ्याचं संपूर्ण वर्षाचं स्वप्न आहे. या पिकावर त्याचं कर्ज फेडण्याचं गणित आहे, घर चालवण्याची चिंता आहे आणि पुढच्या हंगामाची आशा आहे.

दुसरीकडे काही शेतकऱ्यांचे उसाचे बिल अद्याप मिळालेले नाही. कर्जाचा डोंगर डोक्यावर आहे. शेतीत टाकलेला खर्च तरी परत मिळेल का, याची चिंता सतावत आहे. कधी नव्हे ते साखरेला चांगले दिवस आले म्हणतात; पण आमचा ऊस गेला रे आता साखर

• शब्दांकन : लक्ष्मण साबळे •

निवासी संपादक

वाढली त्याचा आम्हाला उपयोग काय आहे. शेतकऱ्याचे दिवस मात्र अजूनही तसेच आहेत.

कर्जमाफीच्या घोषणा होतात, मात्र प्रत्यक्षात त्याचा फायदा प्रत्येक गरजू शेतकऱ्यापर्यंत पोहोचतो का, हा प्रश्न आहे. दरवर्षी पीक विमा भरला जातो; पण नुकसान झाल्यानंतर विम्याची रक्कम हातात येण्यासाठी शेतकऱ्याला किती काळ वाट पाहावी लागणार?

त्याला मोठमोठ्या घोषणा नकोत. त्याला आश्वासनांची भाषणं नकोत.

त्याला फक्त त्याच्या शेतात पाणी हवं आहे.

त्याच्या कष्टाचं चीज व्हावं एवढीच अपेक्षा आहे.

त्याच्या घरची चूल दोन वेळा पेटावी, एवढंच स्वप्न आहे. म्हणूनच आज शेतकऱ्याच्या मनातून एकच आर्त हाक निघतेय.

वरुण राजा, पुणे-मुंबई
सोडून आता गावाकडे ये!
आमच्या शिवारात बरस.
सुकत चाललेल्या
सोयाबीनला जीवदान दे.
काळ्या आईची तहान भागव.
आणि या बळीराजाच्या चेहऱ्यावर
पुन्हा एकदा हसू फुलव.
कारण तुझ्या काही सरींमध्ये
आमच्या अनेक कुटुंबांचं
आयुष्य दडलं आहे.
तू बरसलास तर शेतकरी जगेल...
तू बरसलास तर शिवार
हिरवं होईल...
आणि तू बरसलास तर एका
शेतकऱ्याच्या घरात पुन्हा
आशेचा दिवा पेटेल!



## सुनीता डांगे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नूतन इंग्लिश मीडियम स्कूलच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुनीता डांगे यांचा वाढदिवस शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त शाळेच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वाढदिवसानिमित्त शाळेत आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी नृत्य, गीत, कला व विविध मनमोहक सादरीकरणातून सौ. सुनीता डांगे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. संपूर्ण कार्यक्रमादरम्यान शाळेचा परिसर आनंद आणि उत्साहाने भारून गेला होता. दरम्यान, सौ. सुनीता डांगे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमही राबविण्यात आले. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून वृद्धाश्रमास किराणा साहित्य भेट देण्यात आले. या माध्यमातून वाढदिवसाचा आनंद समाजातील गरजू व ज्येष्ठ नागरिकांसोबत वाटण्याचा संदेश देण्यात आला. यावेळी शिक्षक व विद्यार्थ्यांनी सौ. डांगे यांच्याप्रती असलेला आदर, प्रेम आणि आपुलकी आपल्या शुभेच्छांमधून व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी सौ. सुनीता डांगे यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत केक कापून वाढदिवस साजरा केला.

यावेळी उपस्थितांनी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी मनोगत व्यक्त करताना सौ. डांगे म्हणाल्या, "विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संस्कारक्षम पिढी घडविणे हेच माझे ध्येय आहे." तसेच त्यांनी शिक्षक, विद्यार्थी आणि सर्व शुभेच्छुकांचे आभार मानले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवासलापर्यंत मेट्रो नेण्यासाठी प्रयत्न करणार : आमदार तापकीर

पुणे (आरंभ पर्व) : खडकवासला मतदारसंघातील वाढती लोकसंख्या आणि वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता परिसरातील मेट्रो सुविधेचा विस्तार करण्याच्या मागणीला आता वेग आला आहे. प्रदेश भाजपा ओबीसी मोर्चाचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ कोल्हे यांनी मेट्रोच्या विविध मागण्यांसंदर्भात खडकवासला मतदारसंघाचे आमदार भीमराव अण्णा तापकीर यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. मेट्रोचे शेवटचे स्टेशन खडकवासलापर्यंत नेण्यात यावे, तसेच नांदेड फाटा ते कोल्हेवाडी दरम्यान ब्रीज उभारून त्यावर मेट्रो नेण्यात यावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली. या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत आमदार तापकीर यांनी मेट्रोचे शेवटचे स्टेशन खडकवासलापर्यंत नेण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच नांदेड फाटा ते कोल्हेवाडी ब्रीज उभारून त्यावर मेट्रो करण्यासाठीही संबंधित पातळीवर पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. खडकवासला परिसरातील नागरिकांना भविष्यात जलद आणि सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध व्हावी, यासाठी हा मेट्रो विस्तार महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे या मागणीच्या पाठपुराव्याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रमेश गायकवाड आणि जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते उपस्थित होते.

### प्रेमसंबंध, ब्लॅकमेलिंग आणि बलात्कार; पॉक्सोतील आरोपीला जामीन

पुणे (आरंभ पर्व) : अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंधात राहून लग्नाचे आमिष दाखवत तिच्यावर बलात्कार केल्याचा, तसेच तिची छायाचित्रे घरच्यांना दाखवण्याची धमकी देऊन तिला ब्लॅकमेल करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी पौड पोलीस ठाण्यात दोन युवकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारीनुसार, संबंधित पीडिता ही १५ वर्षे ८ महिन्यांची असून तिची आरोपीशी ओळख झाली होती. त्यानंतर दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. दिनांक ४ एप्रिल २०२६ रोजी आरोपीने तिला पौड येथून विठ्ठलवाडी येथील एका खोलीत नेऊन लग्नाचे आश्वासन देत तिच्यावर बलात्कार केल्याचा तसेच, या प्रेमसंबंधादरम्यान पीडितेने आरोपीसोबतची काही छायाचित्रे सोशल मीडियावर अपलोड केली होती. ही छायाचित्रे पाहिल्यानंतर पीडितेचा चुलत भाऊ याने पीडितेला तिची छायाचित्रे घरच्यांना दाखवण्याची धमकी देऊन तिला ब्लॅकमेल केल्याचा आरोप आहे. तसेच घरात कोणी नसताना पीडितेला आपल्या घरी बोलावून स्वयंपाकघरात नेऊन तिचे कपडे जबरदस्तीने काढून तिच्यावर दोन वेळा लैंगिक अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, आरोपी गणेश शंकर थरकुडे रा. मुळशी याने जामीन मिळण्यासाठी मे. जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथे जामीन अर्ज दाखल केला होता. आरोपीच्या वतीने ॲड. अमेय बलकवडे यांनी युक्तिवाद करताना आरोपी व पीडिता यांच्यामध्ये प्रेमसंबंध असल्याचे तसेच दोघांमध्ये स्थापित झालेले शारीरिक संबंध संमतीने झाल्याचे दिसून येत असल्याचा तसेच, आरोपीने पीडितेवर जबरदस्ती केल्याबाबत कोणताही पुरावा नसल्याचे सांगत आरोपी हा पुणे येथील कायमस्वरूपी रहिवासी असल्याचा युक्तिवाद केला. सदर युक्तिवाद ग्राह्य धरून मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. एस. देशमुख यांनी आरोपी गणेश शंकर थरकुडे यास १५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर व त्याच रकमेच्या एका जामीनदारावर जामीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने ॲड अमेय बलकवडे, ॲड वैभव हाटकर, ॲड ओंकार चव्हाण, ॲड सुहेल बढे, ॲड ओंकार जगताप, ॲड विक्रम कोंडगुळी, ॲड निकिता तोंडे, ॲड मयूर मराठे, ॲड प्रदीप माने, ॲड आदित्य खोपडे, ॲड सायली मांडेकर आणि ॲड ऋषभ सावंत यांनी काम पाहिले.

### पुण्यातील शीतल मानकर-शिंदे यांचा श्वसनाच्या आजाराने मृत्यू



पुणे (आरंभ पर्व) : पारव्यांना दाणे घालणे ही अनेकांसाठी जीवदया आणि माणुसकीची भावना असली, तरी त्यातून निर्माण होणाऱ्या आरोग्यविषयक धोक्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही. पुण्यातील शीतल मानकर-शिंदे यांच्या मृत्यूने हा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पारव्यांशी संबंधित घटकांमुळे फुफ्फुसांना झालेल्या गंभीर आजाराशी तब्बल सात वर्षे संघर्ष केल्यानंतर यावर्षी १९ जानेवारी रोजी उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. त्या अवघ्या ४३ वर्षांच्या होत्या. शीतल यांना सुमारे सात वर्षांपूर्वी श्वसनाचा त्रास जाणवू लागला. सुरुवातीला या त्रासाचे नेमके कारण स्पष्ट होत नसल्याने त्यांनी विविध डॉक्टरांकडे उपचार घेतले. पुढील तपासण्यांनंतर पारव्यांची विष्ठा, पिसे आणि त्यांच्याशी संबंधित धुळीतील घटकांच्या संपर्कामुळे फुफ्फुसांवर गंभीर परिणाम झाल्याचे निदान झाले. यानंतर त्यांच्या उपचारांचा प्रदीर्घ प्रवास सुरू झाला. पुण्यातील मंगेशकर हॉस्पिटल, पुना हॉस्पिटल, डी. वाय. पाटील हॉस्पिटल तसेच मुंबईतील लीलावती हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाही त्यांच्या फुफ्फुसांवरील डाग वाढत गेले आणि श्वसनाचा त्रास दिवसेंदिवस गंभीर होत गेला. आजारपणाच्या काळात शीतल यांना अनेकदा खोकल्याच्या तीव्र उबळींचा सामना करावा लागत असे. त्यामुळे रात्रीची झोपही पूर्ण होत नसे. दैनंदिन जीवनातील साध्या-सोप्या गोष्टीही त्यांच्यासाठी कठीण बनल्या होत्या. घराबाहेर पडतानाही त्यांना ऑक्सिजनचा सिलिंडर सोबत ठेवावा लागत असे.

### डीपीजीयूचा ऑटोमोटिव्ह सायबरसुरक्षा कौशल्यविकासासाठी पुढाकार

पुणे (आरंभ पर्व) : डॉ. डी. वाय. पाटील ग्रुप, पुणे संचालित ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीने (डीपीजीयू) ऑटोमोटिव्ह सायबरसुरक्षा क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विद्यापीठाने स्वयंताज अकॅडमी फॉर स्किल्स अँड नॉलेज आणि जगमंगल सोशल फाउंडेशन यांच्यासोबत सामंजस्य करार केला. पुण्यात ७ ऑगस्ट २०२६ रोजी सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ रोड ट्रान्सपोर्टच्या पुढाकाराने ऑटोसिफू आणि जगमंगल सोशल फाउंडेशनच्या 'प्रयास' उपक्रमाच्या सहकार्याने आयोजित 'ऑटोमोटिव्ह सायबरसुरक्षा टॅलेंट डेव्हलपमेंट इकोसिस्टम – लीडरशिप अँड इन्स्टिट्यूशनल एंगेजमेंट मीट'मध्ये हा करार करण्यात आला.

# काळा कुर्ता, काळी टोपी अन् ठाम एल्गार

## धायरी-नऱ्हेच्या विकासासाठी नगरसेवक राजाभाऊ लायगुडेंचे 'डेरा आंदोलन'!

- सभागृहातही काळ्या वेशात हजेरी
- जोरदार चर्चेनंतर डी.पी. रस्त्यांसह इतर समस्यांवर ६ महिन्यांत तोडगा काढण्याचे महापालिका आयुक्तांचे आश्वासन



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

प्रभागातील रखडलेल्या विकासकामांकडे महापालिका प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष आणि अधिकाऱ्यांच्या टाळाटाळीच्या धोरणाविरोधात पुणे महानगरपालिका प्रभाग क्रमांक ३४ चे नगरसेवक राजाभाऊ लायगुडे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. प्रशासनाच्या अनास्थेचा निषेध नोंदवत काळा कुर्ता-पायजमा आणि डोक्यावर काळी टोपी अशा काळ्या वेशात त्यांनी शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्या कार्यालयात सलग चार दिवस 'डेरा आंदोलन' केले. सकाळी ९ ते सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत ते अधिकाऱ्यांच्या दालनात ठाण मांडून बसले होते.

प्रभाग क्रमांक ३४ मध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या धायरी-नऱ्हे परिसरातील लोकमत प्रेस ते सावित्री गार्डन रोडवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. त्याचबरोबर पिण्याचे पाणी, कचरा व्यवस्थापन आणि रस्त्यांच्या प्रश्नांमुळे नागरिक त्रस्त आहेत.

या भागातील समस्यांबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, माजी महापौर मंजुषा नागपुरे तसेच आमदार भीमराव आण्णा तापकीर यांनी वेळोवेळी कामांना गती देण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, या सूचनांनंतरही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याचा आरोप लायगुडे यांनी केला.

धायरी परिसरात वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त असताना नवीन बांधकामांना परवानग्या दिल्या जात आहेत. मात्र, नागरिकांच्या दळणवळणासाठी अत्यावश्यक असलेले डी.पी. रस्ते विकसित करण्याकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. शहर अभियंत्यांच्या दालनातील आंदोलनानंतर राजाभाऊ लायगुडे यांनी काळा कुर्ता, पायजमा आणि काळी टोपी याच निषेधाच्या पोशाखात महापालिकेच्या मुख्य सभागृहात प्रवेश केला. त्यांच्या या भूमिकेमुळे धायरी-नऱ्हेतील रखडलेल्या विकासकामांवरून सभागृहात जोरदार चर्चा झाली.

या चर्चेनंतर पुणे महापालिका आयुक्तांनी येत्या ६ महिन्यांत डी.पी. रस्त्यांसह परिसरातील प्रमुख समस्यांवर ठोस तोडगा काढण्याचे आश्वासन दिले.

आयुक्तांच्या आश्वासनानंतर भावनिक प्रतिक्रिया देताना नगरसेवक राजाभाऊ लायगुडे म्हणाले, "माझी स्वतःची दोन वेळा अँजिओप्लास्टी झाली आहे. माझ्या प्रकृतीपेक्षा मला या भागातील नागरिकांचे जीव महत्त्वाचे आहेत. लोकांना रोज या रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. एखाद्या नागरिकाचा जीव जाण्याची वाट प्रशासनाने पाहू नये. त्यामुळे हा रस्ता तातडीने करण्यात यावा, हीच माझी मागणी आहे."

ते पुढे म्हणाले, "गेल्या १० वर्षांपासून आम्ही सातत्याने पाठपुरावा करत आहोत. प्रशासनाने केवळ आश्वासनांचे गाजर दाखवले. आता आयुक्तांनी सहा महिन्यांची मुदत दिली आहे. या काळात प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली पाहिजे. अन्यथा हा लढा काळ्या कपड्यांपुरता किंवा अधिकाऱ्यांच्या दालनापुरता मर्यादित राहणार नाही. नागरिकांना सोबत घेऊन थेट जनआंदोलन उभारले जाईल."

"माझ्या आरोग्याची पर्वा न करता मी हा लढा उभा केला आहे; कारण माझ्यासाठी माझ्या प्रभागातील नागरिकांचा जीव आणि सुरक्षितता सर्वांत महत्त्वाची आहे. डी.पी. रस्ता तातडीने झाला पाहिजे," असेही राजाभाऊ लायगुडे यांनी ठामपणे सांगितले.

## उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेची 'मूनफेस्ट'सोबत भागीदारी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त पुण्यातील जी. जी. शाह इंग्लिश मीडियम स्कूलने इंडो सायन्स एज्युकेशन ट्रस्ट आणि ISRO-STC पुणे यांच्या सहकार्याने अंतराळ व विज्ञानविषयक विशेष उपक्रमाचे आयोजन केले. पुणे तसेच आसपासच्या परिसरातील विद्यार्थ्यांना एकत्र आणणाऱ्या या उपक्रमात उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने 'मूनफेस्ट' या संकल्पनेअंतर्गत ब्रँडिंग आणि अनुभव भागीदार म्हणून सहभाग घेतला. या उपक्रमात ४० शाळांमधील ६३० विद्यार्थ्यांनी एकाच वेळी भारताचा पहिला उपग्रह 'आर्यभट्ट' यांच्या प्रतिकृती तयार केल्या. या उपक्रमाची नोंद एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली. विद्यार्थ्यांना अंतराळ विज्ञानाचा प्रत्यक्ष आणि अनुभवात्मक पद्धतीने अभ्यास करता यावा, यासाठी या उपक्रमात मोबाइल प्लॅनेटेरियम, व्हीआर मून वॉक, 3D स्पेस अनुभव, दुर्बिणीद्वारे आकाश निरीक्षण, अंतराळवीरांच्या संकल्पनेवर आधारित इंस्टॉलेशन्स आणि विविध संवादात्मक शैक्षणिक उपक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आणखी एक प्रमुख आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांना ISROच्या शास्त्रज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. शास्त्रज्ञांनी भारताच्या अंतराळ कार्यक्रमाबरोबरच उपग्रह तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनातील भारताच्या यशाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

## समाविष्ट गावांतील करवाढीवरून गटनेते काकासाहेब चव्हाण आक्रमक

### महापालिकेत सर्व विरोधी पक्षांच्या सभासदांची निदर्शने

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

समाविष्ट गावांतील नागरिकांवर लादण्यात आलेल्या करवाढीचा प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे गटनेते काकासाहेब चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आज पुणे महापालिका सभागृहात सर्व विरोधी पक्षांच्या वतीने जोरदार निदर्शने करण्यात आली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नावर प्रशासन आणि सत्ताधारी केवळ आश्वासने देत असून प्रत्यक्ष निर्णय घेण्यास मात्र टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

राज्यात आणि महापालिकेत महायुती सरकार सत्तेत असताना समाविष्ट गावांच्या करप्रश्नावर निर्णय घेण्यास एवढा विलंब का होत आहे? नागरिकांकडून करवसुली करण्यासाठी प्रशासनाची घाई असते, मग त्यांना दिलासा देणारा निर्णय घेण्यासाठी एवढी दिरंगाई का? असा थेट सवाल काकासाहेब चव्हाण यांनी उपस्थित केला. गत १६ मार्च रोजी महापौरांसोबत झालेल्या बैठकीत समाविष्ट गावांतील सर्व सभासदांना विश्वासात घेऊन करप्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सर्वपक्षीय समिती गठित करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, या आश्वासनाला तब्बल पाच महिने उलटूनही एकही बैठक झालेली नाही किंवा प्रश्न सोडविण्याच्या दिशेने कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे दिलेली आश्वासने केवळ वेळकाढूपणासाठी होती का, असा सवालही चव्हाण यांनी केला.

> प्रशासनाच्या या चालढकल कारभाराचा निषेध करत, समाविष्ट गावांच्या करप्रश्नावर येत्या एका महिन्याच्या आत विशेष सभा घेऊन निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी काकासाहेब चव्हाण यांनी केली. नागरिकांवर अन्यायकारक करवाढ लादण्याचा प्रयत्न झाल्यास सर्व विरोधी पक्षांना सोबत घेऊन महापालिकेत आणि सभागृहाबाहेरही संघर्ष अधिक तीव्र केला जाईल, असा स्पष्ट इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी विरोधी पक्ष नेते निलेश निकम, गटनेते चंदू कदम, गटनेते नितीन गावडे, अनिता इंगळे यांच्यासह सर्व विरोधी पक्षातील सर्व नगरसेवक उपस्थित होते.

याचबरोबर, सभागृह नेत्यांनी पहिल्याच मुख्य सभेत शहराच्या विकासासाठी नागरिकांवर अतिरिक्त कराचा बोजा न टाकता महापालिकेच्या उत्पन्नाचे पर्यायी स्रोत बळकट करण्यावर भर देण्याचे स्पष्ट केले होते. समाविष्ट गावांच्या करवाढीचा प्रश्न आगामी अर्थसंकल्पापूर्वी विशेष सभा घेऊन मार्गी लावण्याचे आश्वासनही देण्यात आले होते. मात्र, अर्थसंकल्प सादर होऊनही अद्याप विशेष सभा घेण्यात आलेली नाही. समाविष्ट गावांतील नागरिकांवर अन्यायकारक करवाढीचा भार टाकण्यापूर्वी त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे आणि उपलब्ध नागरी सुविधांकडे महापालिकेने गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. कर आकारणीच्या बाबतीत शहरातील इतर भागांप्रमाणे सुविधा आणि सेवा देण्याची जबाबदारीही महापालिकेची आहे, अशी भूमिका यावेळी मांडण्यात आली.

## वीरांश युथ फाऊंडेशन आयोजित मंगळागौर स्पर्धा उत्साहात संपन्न



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वीरांश युथ फाउंडेशनच्या वतीने आयोजित 'मंगळागौर स्पर्धा उत्सव २०२६' उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

संस्थापक अध्यक्ष सौ.कोमल सतीश कुटे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.. श्रावणातील पारंपरिक मंगळागौर उत्सवाला आधुनिक स्पर्धेची जोड देत महिलांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होत कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

मंगळागौर स्पर्धेत स्वरा स्वप्निल दाभाडे धायरी यांनी प्रथम क्रमांक, पूनम भालेराव चव्हाण नरहे यांनी द्वितीय क्रमांक, तर अंजली कदम वडगाव यांनी तृतीय क्रमांक पटकावला.

तसेच उखाणा स्पर्धेत निलम भोज यांनी प्रथम क्रमांक, तर तृप्ती सोनार यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनिता दिलीप भोसले,अरूणा प्रवीण निर्मळ यांनी केले. यावेळी भाजपा महिला मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या बिंदा गणात्रा, पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका मोनिका मोहोळ, भाजपा महिला मोर्चा पुणे शहरच्या मनीषा लडकत, ऋशाली शेखदार, अर्चना मारणे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सारिका पोकळे, अनिता कुटे, अरुणा कुटे, सुमन शिंदे, ललिता कुंभार, मनीषा बाराते, प्रियांका पवार, बेबी सरोदे, रुपाली रावत, रेणुका दूधभाते यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान विविध महिला बचतगटांचाही गौरव करण्यात आला. जोगेश्वरी महिला बचतगट – मनीषा बाराते, मैत्रीण महिला बचतगट – पूनम भालेराव चव्हाण शिवकन्या महिला बचतगट – योगिता कदम, सखी महिला बचतगट – स्वरा स्वप्निल दाभाडे, तुळजा भवानी महिला बचतगट – सपना माजरे, रणरागिणी महिला बचतगट – रेणुका दूधभाते, सहीश्वरी महिला बचतगट – मोहिनी अग्रवाल, लक्ष्मी महिला बचतगट – प्रियांका पाटील, तिरुपती महिला बचतगट – वनिता भोसले आणि जिजामाता महिला बचतगट – मनीषा बाराते यांचा सहभाग उल्लेखनीय ठरला.

महिलांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत मंगळागौरीचे खेळ, उखाणे आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. या कार्यक्रमामुळे परिसरातील महिलांना एकत्र येत आपल्या कलागुणांना वाव देण्याची संधी मिळाली. महिलांच्या सक्षमीकरणासोबतच पारंपरिक संस्कृती आणि सामाजिक एकोपा जपणारे उपक्रम यापुढेही सातत्याने आयोजित करण्याचा संकल्प वीरांश युथ फाउंडेशनच्या वतीने करण्यात आला.

## क्राफ्टशालामुळे इंजिनिअरिंग पदवीधराला मार्केटिंगमध्ये सापडली नवी वाट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



व्हीआयटी पुणे येथून बी.टेक पदवीधर आणि राष्ट्रीय स्तरावरील हॅकेथॉन विजेते प्रथमेश सोनवणे यांचा इंजिनिअरिंगपासून मार्केटिंग क्षेत्रापर्यंतचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कोविड-१९ महामारीदरम्यान कॅम्पस प्लेसमेंटची संधी हुकल्यानंतर त्यांनी आपल्या करिअरच्या दिशेचा पुनर्विचार केला आणि डिजिटल व परफॉर्मन्स मार्केटिंगमध्ये नवी वाट शोधली. नाशिकमध्ये वाढलेल्या प्रथमेश यांनी व्हीआयटी पुणे येथून बी.टेकचे शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन काळात राष्ट्रीय स्तरावरील हॅकेथॉनमध्ये विजय मिळवल्यामुळे पदवी पूर्ण केल्यानंतर इंजिनिअर म्हणून करिअर सुरू करण्याची त्यांची अपेक्षा होती. मात्र, कोविड-१९ महामारीमुळे कॅम्पस प्लेसमेंटची संधी हुकली आणि त्यांच्या करिअरला अनपेक्षित वळण मिळाले. या काळात प्रथमेश 'सस्टेन अँड सेव्ह' या एनजीओसोबत जोडले गेले. संस्थेची वेबसाइट आणि सोशल मीडिया उपक्रम हाताळताना त्यांची डिजिटल मार्केटिंगशी ओळख झाली. तंत्रज्ञान आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचता येते, याची जाणीव त्यांना या अनुभवातून झाली. "मार्केटिंग म्हणजे केवळ उत्पादने विकणे, असे मी नेहमी गृहीत धरले होते. एनजीओसोबत काम करताना मला जाणवले की तंत्रज्ञान आणि सर्जनशीलता एकत्र येऊन लोकांवर कसा प्रभाव टाकू शकतात," असे प्रथमेश यांनी सांगितले.

# सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडीवर चरवड यांचा पुढाकार

## दहा चौकांत वॉर्डन नियुक्त : नगरसेवक हरिदास चरवड यांचा आदर्श उपक्रम..; आ. तापकीर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड रस्त्यावरील दिवसेंदिवस वाढत असलेली वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नगरसेवक हरिदास कृष्णा चरवड यांनी स्वतःहून पुढाकार घेतला आहे. प्रशासनाकडे केवळ पाठपुरावा न करता, आपल्या माध्यमातून सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडीच्या दृष्टीने महत्त्वाच्या दहा चौकांमध्ये वॉर्डन नियुक्त करण्याची संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात आणली आहे.

या उपक्रमांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या वॉर्डनना आमदार भीमराव तापकीर यांच्या हस्ते जॅकेट प्रदान करण्यात आले. यावेळी आमदार तापकीर यांनी या उपक्रमाचे कौतुक करत वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने अशा प्रत्यक्ष उपाययोजना आवश्यक असल्याचे सांगितले.

सिंहगड रस्त्यावरील प्रयेजा सिटी सोसायटी चौक, वीर बाजी पासलकर चौक, वडगाव बुद्रुक भाजी मंडई चौक, नवले पूल चौक, धायरी फाटा, धायरी उंबऱ्या गणपती चौक, पारी कंपनी चौक, वेताळबुवा चौक, भूमकर चौक आणि बँक ऑफ महाराष्ट्र चौक, नऱ्हे या दहा प्रमुख ठिकाणी वॉर्डन नियुक्त करण्यात येणार आहेत. या वॉर्डनच्या माध्यमातून गर्दीच्या वेळेत वाहतूक नियमन करणे, वाहनांची कोंडी कमी करणे तसेच चौकांमध्ये वाहतुकीचा प्रवाह सुरळीत ठेवण्याचे काम केले जाणार आहे. सिंहगड रस्त्यावर सकाळी आणि सायंकाळच्या वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याने या उपक्रमाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वाहतूक कोंडी हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित महत्त्वाचा प्रश्न असून, त्यावर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष उपाययोजना करण्याची गरज आहे. याच भूमिकेतून नगरसेवक हरिदास चरवड यांनी स्वतःच्या माध्यमातून वॉर्डन नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सिंहगड रस्त्यावरील वाहतुकीला शिस्त लागण्यास तसेच प्रमुख चौकांमधील कोंडी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी पुणे मनपा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अरुण राजवाडे, भाजप प्रभाग अध्यक्ष राजूदादा कुटे, विशाल कुटे, माजी उपसरपंच अक्षय इंगळे,सुनीलअण्णा वाल्हेकर,यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

## आपल्या जाहिरातींसाठी विश्वासार्ह व्यासपीठ

शासकीय, निमशासकीय, बँकिंग व सार्वजनिक जाहिरातींसाठी प्रभावी माध्यम

**आपल्या संस्थेच्या सर्व प्रकारच्या अधिकृत जाहिराती आता प्रसिद्ध करा दैनिक आरंभ पर्व मध्ये – विश्वास, पारदर्शकता आणि व्यापक वाचकवर्ग असलेले प्रभावी माध्यम.**

### आम्ही प्रसिद्ध करतो :

- शासकीय जाहिराती ✓
- ग्रामपंचायत जाहिराती ✓
- निविदा / टेंडर नोटीस ✓
- जाहीर नोटीस ✓
- बँकांचे ताळेबंद व लिलाव सूचना ✓
- सहकारी संस्था जाहिराती ✓
- शैक्षणिक संस्था सूचना ✓
- कोर्ट / कायदेशीर नोटीस ✓
- सार्वजनिक सूचना व प्रसिद्धीपत्रके ✓
- व्यवसायिक व व्यापारी जाहिराती ✓

### का निवडाल दैनिक आरंभ पर्व?

- ग्रामीण व शहरी भागात प्रभावी पोहोच
- कमी दरात उत्तम प्रसिद्धी
- जलद व अचूक प्रकाशन सेवा
- विश्वासार्ह आणि लोकप्रिय माध्यम
- डिजिटल व प्रिंट दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्धी




आपल्या जाहिराती अधिकधिक लौकांपर्यंत पोहोचवण्यासाठी
**आजच संपर्क साधा!**

संपर्क : प्रतिक गंगणे
7276314142
8657865702

ई-मेल : aparvinfo@gmail.com

**दैनिक आरंभ पर्व | "आपल्या विश्वासाचे वृत्तपत्र"**